# तळा नगरपंचायत तळा

मु.पो.ता.तळा,जि.रायगड, पिन कोड 402111
फोन नं.02140-269026 Email id-nagarpanchayattala@gmail.com

जा.क्र./तनपं/४७६/२०२५-२६

दिनांक : १०/०१/२०२५

प्रति,

संपादक

दैनीक सागर

**विषय : आपली सेवा आमचे कर्तव्य जाहीर सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविणेत येते की, तळा नगरपंचायतीची **"आपली सेवा आमचे कर्तव्य"** जाहीर सूचना आपले दि.११/०१/२०२५ चे अंकात प्रसिद्ध करून त्यांची ३ प्रती तळा नगरपंचायतीस सादर करावी.

तळा नगरपंचायत, तळा
स्थापना
२६ जुन २०१५
जि. रायगड

(मनीषा नामदेव वजाळे)
मुख्याधिकारी
तळा नगरपंचायत तळा

Scanned with OKEN Scanner

# तळा नगरपंचायत

मु.पो.ता. तळा, जि. रायगड, पिन कोड ४०२१११

फोन नं. ०२१४०-२६९०२६ Email id-nagarpanchayattala@gmail.com

## आपली सेवा आमचे कर्तव्य

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणामार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादित देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून, तो दि. २८/०४/२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सूचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून, आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा. आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथू असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरिकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुध्द संबंधितांना वरिष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसुरदार अधिकाऱ्यास प्रति प्रकरण रु. ५०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

तळा नगरपंचायतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी करण्यासाठी ५८ सेवा अधिसूचित केल्या असून त्यानुसार नामनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिल अधिकारी यांची नेमणूक केलेली आहे. त्याचा तपशिल तळा नगरपंचायत कार्यालयात नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे.

**दिनांक : ०९/०१/२०२५**

**सही/-**

**(मनीषा नागसेन वजाळे)**

**मुख्याधिकारी**

**तळा नगरपंचायत, तळा**